PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Maratha Tituka Melwawa
Year: 1964

Song: Bahu Asot Sundar
Lyricist: Shripadkrushn Kolhatkar

बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा
गगनभेदि गिरीविण अणू नच जिथे उणे
आकांक्षां पुढति जिथे गगन ठेंगणे
अटकेवरी जेथील तुरंगी जल पिणे
तेथ अडे काय जलाशय न दाविणे
पौरूषासि अटक गमे जेथ दुःसहा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा

विक्रम वैराग्य एक जागी नांदती
जरी पटका भगवा झेंडा हि डोलती
धर्म राजकारण समवेत चालती
शक्ति युक्ति एकवटूनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ती अशी विस्मयावहा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देशहा

गीत मराठ्याचें श्रवणी मुखी असो
स्फूर्ति दीप्ति धृति हि जेथ अंतरी ठसो
वचनि लेखनी हि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्र धर्म मर्म मनी वसो
देह पडो तत्कारणी ही असे स्पृहा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*